# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## ( कुलसचिव कार्यालय )

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

फोन/फॅक्स नं. ०७१३२-२२३१०४ email:-registrar.gondwanauniversity@gmail.com


जा.क्र. /गो.वि.ग/कुसका/४२०७/२०१७ दि. १५/०७/२०१७

## अधिसुचना

**विषय :- अधिसभा निवडणूका(मतदान केंद्रावरील)**

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१ मार्च, २०१७ पासुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ लागु केला आहे. त्यातील **कलम २८(२) नुसार अधिसभेचे** गठण करणे आवश्यक असून त्यातील उपकलम २८ (२)(o) नुसार प्राचार्य, कलम २८(२)(P) नुसार संलग्न महाविद्यालय अथवा परिसंस्थांचे व्यवस्थापन प्रतिनिधी, कलम २८(२)(r) नुसार अध्यापक, आणि कलम २८(२)(s) नुसार विद्यापीठ अध्यापक निवडुन द्यावयाचे आहेत. यादृष्टीने सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील प्राचार्य, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, अध्यापक आणि विद्यापीठ अध्यापक यांच्या मतदार यादया तयार करावयाच्या आहेत.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यक्ष / सचिव / विद्यापीठ अध्यापक यांना या अधिसूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये/विभागात कार्यरत असलेल्या प्राचार्य/अध्यापकांची, व्यवस्थापन प्रतिनिधी व विद्यापीठ अध्यापक यांची माहिती विद्यापीठाच्या www.unigug.org या संकेतस्थळावर Election Portal अंतर्गत Collegiums link वर विहीत केलेल्या प्रपत्रामध्ये आवश्यक असलेल्या सर्व माहितीची नोंद केल्यावर त्या प्रपत्राची प्रिंट काढून आवश्यक ते दस्तऐवज प्रपत्रासोबत जोडून एकत्रितरित्या विद्यापीठास शनिवार दिनांक ०५/०८/२०१७ रोजी किंवा त्यापुर्वी पोहचेल अशा बेताने सादर करावी.

विविध प्राधिकरणावर निवडुन द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या आहेत. दिलेल्या गटांची माहिती विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास त्यांचे नावाचा समावेश संबधीत गटाच्या मतदार यादीमध्ये करण्यात येणार नाही आणि यासाठी महाविद्यालय/ संस्था/ विभाग जबाबदार राहील, यांची नोंद घ्यावी.

विधी आणि विधानामधील कोणत्याही तरतुदीचा अर्थ काढण्यासंबंधात अडचण येत असल्यास विधी विधानाचे इंग्रजी प्रतीमधील तरतुद प्रमाण मानण्यात येईल.

( दिपक एस. जुनघरे )
कुलसचिव(का.) आणि
निवडणूक निर्णय अधिकारी

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे
मा. प्राचार्य/व्यवस्थापनाचे अध्यक्ष/सचिव/अध्यापक, विद्यापीठ शिक्षण विभाग,